# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

क्र.सिंजिप/ग्रापापुवि/लेखा-7/दरपत्रके/2362/2022 दि. U /01/2022

## दरपत्रक सुचना

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, कार्यालय सिंधुदुर्गनगरी दुरध्वनी क्र. 2362-228094 यांचकडून त्यांचे अधिनस्त खालील उपविभाग यांचे क्षेत्रिय फिरती करिता एकुण तिन (03) पेट्रोल /डिझेल/सीएनजी वहाने पुरविणे कामी खाजगी वाहन पुरवठादार / संस्थाकडून दरपत्रक मागविणेत येत आहेत.

तरी इच्छुक पुरवठादार यांनी खाली सही करणार यांचे नांवे दि. 17 / 01 /2022 रोजी दुपारी ठिक 12.00 वाजेपर्यन्त सिलबंद दरपत्रके सादर करणेची आहेत.दरपत्रकावर (लखोट्यावर) ज्या विभागासाठी वाहन भाडे तत्वावर पुरविणेस इच्छुक असाल त्यांचा स्पष्ट उल्लेख करणेत यावा.तसेच पुरवठादार यांनी तांत्रिक लखोटा व दराबाबतचा लखोटा असे वेगवेगळे लखोटे एकाच मोठ्या लखोट्यात सादर करणे आवश्यक आहे. त्यावर स्वता चा भ्रमणध्वनी तसेच ई मेल आयडी व पत्ता नमुद करावा.

प्राप्त दरपत्रके शक्यतो त्याच दिवशी 4.00 वाजता उपस्थित पुरवठाधारकासमोर उघडणेत येतील.

कामाचा तपशिल

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | उप अभियंता, (यांत्रिकी) उप विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग-सिंधुदुर्गनगरी ता.कुडाळ यांचे क्षेत्रिय फिरती करीता इर्टीका/ झायलो / स्कॉर्पिओ / टाटा सुमो अथवा तत्सम प्रकारची गाडी भाडे तत्वावर घेणेसाठी (मासिक 3000 कि.मी.चालेल) | 1 नग | 1 वर्ष |
| 2 | उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, देवगड, ता.देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग यांचे क्षेत्रिय फिरती करीता इर्टीका / झायलो / स्कॉर्पिओ / टाटा सुमो अथवा तत्सम प्रकारची गाडी भाडे तत्वावर घेणेसाठी (मासिक 3000 कि.मी.चालेल) | 1 नग | 1 वर्ष |
| 3 | उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, ओरोस, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग यांचे क्षेत्रिय फिरती करीता इर्टीका/ झायलो / स्कॉर्पिओ / टाटा सुमो अथवा तत्सम प्रकारची गाडी भाडे तत्वावर घेणेसाठी (मासिक 3000 कि.मी.चालेल) | 1 नग | 1 वर्ष |

कोरी दरपत्रक या कार्यालयाकडून विक्री केली जाणार नाही. इच्छुक अधिकृत पुरवठादार यांनी दरपत्रके सादर करण्यापूर्वी जि.प.नोटीस बोर्ड / दैनिक /साप्ताहीक / जि.प.संकेतस्थळ ( https://www.zpsindhudurg.gov.in व https://www.sindhudurg.nic.in येथे अटी व शर्ती बाबत खात्री करावयाची आहे. बयाणा रक्कम व फॉर्म फि ही दरपत्रके मंजूर झालेवर चलनाने किंवा धनादेशाव्दारे भरावयाची आहे. याबाबत काही शंका असल्यास इच्छुक अधिकृत पुरवठादार यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.सिंधुदुर्ग यांचे 02362/228094 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

## दर तपशिल

| अ.क्र. | कामाचा तपशिल ( उपविभागाचे नाव ) | सर्व करांसहित दर र रू.प्रति किलो मीटर | अक्षरी रक्कम रु. |
|---|---|---|---|
| | | | |

**वरिल दरपत्रक लखोट्यात सोबत सादर करावयाची कागदपत्रे-**

*1) वाहनाचे आर.सी.बुक छांयाकित प्रत 2) विमा पॉलिस छांयाकित प्रत 3) पॅन कार्ड छांयाकित प्रत*

*4) GST प्रमाणपत्र किंवा वार्षिक उलाढाल हमी पत्र किंवा मागील तिन वर्षाचे इनकम टॅक्स रिर्टन छांयाकित प्रत*

*5) अटी व शर्ती बाबत स्वताचे सहीची प्रारुप 6) PUC प्रमाणपत्र छांयाकित प्रत*

अटी व शर्ती :

1. कोणतेही दरपत्रक मंजूर/नामंजूर करणेचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
2. सदर वाहनाचा करार हा आदेश दिल्याचे दिनांकापासून 1 वर्षापर्यन्त किंवा पुढील मक्ता निश्चित करेपर्यन्त असले.
3. सदर वाहन हे वाहनाच्या प्रथम नोंदणीपासून दिनांक 01/01/2022 पर्यन्त 5 वर्षापेक्षा जुने नसावे.
4. प्रत्येक वाहनाकरिता स्वतंत्र फॉर्म भरणे आवश्यक आहे.
5. दरपत्रक मंजुर झालेनंतर वरील वाहनासाठी र.रु.14.400/- प्रमाणे सुरक्षा अनामत भरणे आवश्यक राहील.
6. मंजुर दरपत्रक धारकास अटी शर्ती मान्य असल्याचा करारनामा र.रु.500/- चे बॉंड पेपरवर करुन दयावा लागेल.
7.

कार्यकारी अभियंता (ग्रापापु),
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

प्रत :

1. कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.
2. खाते प्रमुख, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग (सर्व) यांजकडे माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी.
3. जिल्हा परिषद संकेतस्थळ मोफत प्रसिध्दीसाठी.
4. गट विकास अधिकारी पंचायत समिती सर्व